**वाचले :-**

१. आदेश क्र.प्रशा/१/कावि/१०२२/२०२० दिनांक ०३/०६/२०२०

२. 'उपअभियंता (पर्यावरण)' पदोन्नती समिती सभा दि.१४/१०/२०२१ चा सभावृत्तांत.

३. पत्र क्र.प्रशा/७/कावि/५१/२०२२ दि.०१/०२/२०२२

४. क्रमांक : पीसीसी-२०२०/प्र.क्र.१७/नवि-२२ दिनांक २३ सप्टेंबर, २०२४

५. मा.आयुक्त सो यांचा दिनांक ३ /१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/६८५/२०२४
दिनांक ३/१०/२०२४

**विषय :- श्री.सोहन निकम यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा उपअभियंता (पर्यावरण) पदावर समावेशनाने वर्ग करणेबाबत...**

**आदेश,**

महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : पीसीसी-२०२०/प्र.क्र.३६१/नवि-२२ दिनांक १ फेब्रुवारी, २०२१ अन्वये सुधारीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापेनवरील पर्यावरण या संवर्गातील पदोच सेवाप्रवेश नियम तसेच पदनिर्मिती करण्याकामी मान्यता देण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील उपअभियंता (स्थापत्य) पदावर श्री.निकम सोहन मधुकर हे दिनांक ०३/०६/२०२० पासून पदोन्नतीने कार्यरत आहेत. श्री.निकम सोहन मधुकर, उपअभियंता (स्थापत्य) हे पर्यावरण या विषयातील पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत. मात्र उपर्युक्त शासनमान्य सेवाप्रवेश नियमामध्ये समकक्ष पदावरील सेवा समावेशनाने वर्ग करण्याबाबतची तरतुद नसल्याने 'श्री.निकम सोहन मधुकर यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा उपअभियंता (पर्यावरण) या पदावर समावेशनाने नियुक्ती करण्यास मान्यता मिळणेकरीता शासनाचे नगरविकास विभागास कळविण्यात येवून शासन मान्यतेने श्री.निकम सोहन मधुकर यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा उपअभियंता (पर्यावरण) या पदावर वर्ग करावी' असा दि.१४/१०/२०२१ रोजीच्या पदोन्नती समितीने निर्णय घेतला आहे.

पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार श्री.सोहन निकम यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा उपअभियंता (पर्यावरण) पदावर समावेशनाने वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव महापालिकेमार्फत दिनांक ०१/०२/२०२२ रोजी शासनास सादर करण्यात आला. त्याअनुषंगाने उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजीचे पत्रान्वये श्री.सोहन निकम मधुकर, उपअभियंता

(स्थापत्य) यांची सेवा पदोन्नतीच्या दिनांकापासून उपअभियंता (पर्यावरण) या पदावर समावेशन करण्यास एकवेळची बाब म्हणून मान्यता दिलेलेली आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रस्तुत आदेशान्वये प्राप्त शासन मान्यतेनुसार श्री.निकम सोहन मधुकर यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा दिनांक ०३/०६/२०२० पासून उपअभियंता(पर्यावरण) या पदावर समावेशनाने वर्ग करण्यास मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवाअभिलेखामध्ये घेण्यात यावी.

*(शेखर सिंह)*
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित अधिकारी
प्रत- सर्व संबंधित विभाग